**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५२/२०२४ मधील</u>**
**<u>निशाणी क्र. ३३ खालील आदेश</u>**
**<u>(MHRT080003122024)</u>**

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

**०२.** प्रस्तुतचा दावा हा सरस निरस वाटप होवुन वादीचा तुटक स्वरुपात ताबा जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे मार्फत हद्द मेरेनिशी होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हा अद्याप प्राथमिक स्थीतीत प्रलंबित असल्याचे दिसून येते.

**०३.** दिनांक ०६/०२/२०२५ रोजी प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांच्याविरूध्द विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. अर्जातील कारण, दाव्याचे स्वरुप व सद्याची दाव्याची प्रलंबित स्थीती लक्षात घेता, उभयपक्षकारांमध्ये वादाचे मुद्दे अंतिमतः निकाली काढण्यात व भविष्यातील उभयपक्षकारांचे न्यायालयीन कामकाजचे प्रमाण टाळण्यास, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. अर्ज मंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसून येत नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास सदर प्रतिवादींना त्यांचे म्हणणे अभिलेखावर मांडता येता येणार नाही. त्यामुळे, सदर प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसून येते. परंतू, अर्ज मंजूर करताना वादीचे झालेले वेळेचे नुकसान दुर्लक्षीत करुन चालणार नाही. सबब, खर्चाच्या अटीवर अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज वादीला पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी रक्कम रुपये २००/– इतका

खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. आदेशान्वये पूर्तता केल्यानंतर पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.20 11:47:07 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

दिनांक १९/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवरुख,

देवरुख. जि. रत्नागिरी.

**-:CERTIFICATE:-**

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

Name of Stenographer :- S. A. Bhale

Court Name :- The Court of Civil Judge (J.D.) and
Judicial Magistrate F.C., Deorukh

Date of decision :- 19/09/2025

Order signed by PO. On :- 19/09/2025

Order uploaded on :- 20/09/2025